# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २५१-२२** **दिनांक १४/०८/२०२२**

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मि.भा.व.वि आयुक्तालयाचे वतीने आयोजीत करण्यात आलेली '७५ किलोमीटर दौड' आज पुर्ण.

भारताच्या स्वातंत्र्य अमृत महोत्सवी वर्षानिमित्त (आजादी का अमृत महोत्सव) मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने 'आझादी का अमृत महोत्सव दौड' व 'हर घर तिरंगा' या कार्यक्रमास प्रोत्साहित करणाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेले होते. त्यानुसार दिनांक २३/०७/२०२२ ते दिनांक १४/८/२०२२ रोजीपावेतो ७५ किलोमीटर दौड देखील आयोजीत करण्यात आली होती. त्यामध्ये दिनांक २३/७/२०२२ रोजीपासून दर एक दिवसआड ५ ते ६ किलोमिटर धावून दौड पुर्ण करण्यात येत होती. दिनांक १४/०८/२०२२ रोजी सदर दौडच्या शेवटच्या दिवशी परिमंडळ-१ मध्ये काशिमिरा पोलीस स्टेशन ते मॅक्सेस मॉल व परत मॅक्सेस मॉल ते काशिमिरा पोलीस स्टेशन असे १० किलोमिटर दौडचे आयोजन करण्यात आले होते. सदर दौडला सकाळी ६:३० वाजता मा. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांनी हिरवा झेंडा दर्शविल्यानंतर सुरवात करण्यात येवून ०८:०० वाजता सांगता करण्यात आली. सदर १० किलोमिटर दौडमध्ये प्रथम येणाऱ्या ३ महिला पोलीस व ३ पुरुष पोलीसांचा मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त यांनी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला आहे. सदर दौडमध्ये **महिलांमध्ये प्रथम क्रमांक** सारिका वाघचौरे, महिला पोलीस उपनिरीक्षक-नवघर पो. स्टे, **द्वितीय क्रमांक** मपोकॉ. रेखा आगलावे-विशेष शाखा व **तृतीय क्रमांक** मपोकॉ. सिमा दाते-विशेष शाखा तसेच **पुरुषांमध्ये प्रथम क्रमांक** पोकॉ कृष्णा गोरखाना-विरार वाहतूक शाखा, **द्वितीय क्रमांक** पोउपनि. अशोक बान्सी-काशिमिरा पोलीस स्टेशन व **तृतीय क्रमांक** पोकॉ रणजीत बंगे-मिरारोड पोलीस स्टेशन यांनी पटकावला आहे.

परिमंडळ-२ मध्ये सनसिटी वाहतूक पोलीस चौकी ते गास रोड-भुईगांव नाकामार्गे निर्मळ ते परत सनसिटी वाहतूक पोलीस चौकी असे १० किलोमिटर दौडचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे परिमंडळ-३ हद्दीमध्ये विरार प. जकात नाका ते समेलपाडा नालासोपरा व परत समेलपाडा ते जकात नाका असे १० किलोमिटर दौडचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १४/०८/२०२२ रोजी सकाळी ६:३० वाजता आयोजीत करण्यात आलेल्या दौडमध्ये मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त श्री. संजयकुमार पाटील, सहा. पोलीस आयुक्त श्री शशीकांत भोसले, श्री विलास सानप, श्री. रामचंद्र देशमुख, श्री चंद्रकांत जाधव, श्री. पंकज शिरसाठ, श्रीमती

पद्मजा बडे, श्री अमोल मांडवे व इतर पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी यांनी मोठया उत्साहाने सहभाग नोंदविला होता.







**महिला प्रथम क्रमांक-पोउपनी सारिका वाघचौरे** **प्रथम पुरुष क्रमांक-कृष्णा गोरखाना**






